| MHSN060036332016 | R.C.S. 362/2016<br>Chinmay Malikarjun / Anil Magdum (Guardian) Vs. Mahadev Dundappa Magdum |
|---|---|

## निशाणी ४० व ४१ वरील संयुक्त आदेश

०१. प्रस्तुतचे अर्ज वादी यांनी प्रतिवादी नं. १ व २ यांचे मयत वारस नोंद मंजूर करणेस झालेला विलंब माफ होऊन मयताचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, वादी यांना त्यावेळी कोरोना महामारी सुरु असलेने तसेच तद्नंतर वादी या आजारी पडलेने ते आपल्या वकिलांना भेटून मयताबाबतची व वारसांची माहीती देऊ शकल्या नाहीत. तसेच प्रतिवादी क्र. १ व २ यांचे वारस यापुर्वीच दावेत समाविष्ठ आहेत. त्यामुळे त्यांचे वारस रेकॉर्डवर आणणेची माहीत नव्हते. या सर्व कारणांमुळे वादींना मुदतीत वारस रेकॉडवर आणता आले नाही. सबब वादीने सदरचे अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी तर्फे सदर अर्जास म्हणणे दाखल न केलेने सदरचे अर्ज त्यांचे म्हणणे विना चालविणेत आले.

०३. वादीचा अर्ज व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. युक्तीवाद ऐकला.

०४. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द तुटक वाटप, मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादीने सदर अर्जांच्या सोबत स्वतःचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. वादी यांच्या अर्जात नमूद केलेल्या कारणांमध्ये प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे दिसून येते. तसेच सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींचे नूकसान होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदरचे अर्ज मंजूर होणे योग्य होणार आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांमधील असलेला वाद संपुष्टात आणणेसाठी व न्यायदानासाठी मदत होईल. तसेच यामुळे दाव्यांची संख्या मर्यादित राहून वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असणारे मुद्दे एकत्रात निकाली करणे सोपे होईल.

०५. दाव्याचे स्वरुप व अर्जात नमुद केलेली हकीकत लक्षात घेता माझ्या मते,

दाव्याचा गुणदोषावर अंतिम निर्णय होणेसाठी प्रस्तुत वादीचा अर्ज मंजूर करुन अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देणे उचित होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## **आ दे श**

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचे अर्ज मंजूर करण्यात येत आहेत. |
| २. | वादीने प्रस्तुत अर्जांमध्ये नमूद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये विहीत कालावधीत योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी. |
| ३. | वादीने दुरुस्त वादपत्राची प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी दयावी. |

Sd/---

ठिकाण –मिरज. (श्रीमती आर. व्ही. कांबळे)
दिनांक –०८.०१.२०२४. दुसरे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मिरज.

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana |
| Name of Court | :- | $2^{nd}$ Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist.Sangli. |
| Date of decision / typed | :- | 08.01.2024 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 08.01.2024 |
| Judgment/order uploaded on | :- | 08.01.2024 |